राज्य सेवा (मुख्य) परीक्षा- २०२३ परीक्षा दिनांक २२ जानेवारी, २०२४.

**2023**

**N18**

प्रश्नपुस्तिका क्रमांक
BOOKLET NO.
605409

संच क्र. **A**

# प्रश्नपुस्तिका

## सामान्य अध्ययन – IV

**एकूण प्रश्न : 150**

**वेळ : 2 (दोन) तास** **एकूण गुण : 150**

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत **150** अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा–क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

| परीक्षा–क्रमांक | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|

केंद्राची संकेताक्षरे शेवटचा अंक

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) (अ) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तर–क्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्न–क्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(ब) **आयोगाने ज्या विषयासाठी मराठी बरोबर इंग्रजी माध्यम विहित केलेले आहे. त्या विषयाचा प्रत्येक प्रश्न मराठी बरोबर इंग्रजी भाषेत देखील छापण्यात आला आहे. त्यामधील इंग्रजीतील किंवा मराठीतील प्रश्नामध्ये मुद्रणदोषांमुळे अथवा अन्य कारणांमुळे विसंगती निर्माण झाल्याची शंका आल्यास, उमेदवाराने संबंधित प्रश्न पर्यायी भाषेतील प्रश्नाशी ताडून पहावा.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नांकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही. एकापेक्षा जास्त उत्तरे नमूद केल्यास ते उत्तर चुकीचे धरले जाईल व त्या चुकीच्या उत्तराचे गुण वजा केले जातील.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चुकीच्या उत्तरांकरीता 25% किंवा 1/4 एवढे गुण एकूण गुणांमधून वजा/कमी करण्यात येतील."**

SEAL

पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम–82" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरुद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा.**

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

1. रोख शिल्लक दृष्टीकोनाच्या मार्शलच्या समीकरणामध्ये, M = KPY, 'K' हे अक्षर ________ दर्शविते.
(1) पैशाचा पूरवठा
(2) पैशाचा भ्रमणवेग
(3) वास्तव उत्पन्नाचा असा भाग जो लोक स्वत:जवळ रोख स्वरुपात बाळगू इच्छितात
(4) किंमत पातळी

In the Marshallian equation of the Cash Balance Approach, M = KPY, the letter 'K' stands for
(1) Supply of money
(2) Velocity of circulation of money
(3) Fraction of real income which people desire to hold in money
(4) Price level

---

2. खालील विधाने विचारात घ्या.
a. एप्रिल–नोव्हेंबर, 2022 मध्ये यूएसए हे सर्वोच्च निर्यातीचे ठिकाण होते.
b. एप्रिल–नोव्हेंबर, 2022 मध्ये नेदरलँड भारताच्या निर्यातदार भागीदारीत तिसऱ्या क्रमांकावर होता.

वरीलपैकी कोणते/ती विधान/ने योग्य आहे/त?
(1) दोन्ही a आणि b योग्य आहेत
(2) केवळ b योग्य आहे
(3) केवळ a योग्य आहे
(4) वरीलपैकी कोणतेही योग्य नाही

Consider the following statements.
a. The USA was the top export destination in April – November, 2022.
b. Netherland was the 3rd spot as India's exporting partner in April–November, 2022.

Which of the statement/s given above is /are correct ?
(1) Both a and b are correct
(2) Only b is correct
(3) Only a is correct
(4) None of the above are correct

---

3. खालीलपैकी कोणते/ती विधान/ने चूक आहे/त ?
a. 2022-23 मध्ये भारतीय व्यापारी मालाची निर्यात US $ 450.4 अब्ज इतकी होती ती मागील वर्षी 44.6 टक्क्यांच्या तुलनेत 6.7 टक्क्यांनी वाढली.
b. 2022-23 मध्ये भारतीय व्यापारी मालाची आयात US $ 613.1 अब्ज इतकी होती ती मागील वर्षीच्या 30.3 टक्क्यांच्या तुलनेत 4.4 टक्क्यांनी वाढली.

(1) फक्त a चूक आहे
(2) फक्त b चूक आहे
(3) दोन्ही a आणि b चूक आहेत
(4) वरीलपैकी कोणतेही चूक नाही

Which of the following statement/s is/are incorrect ?
a. Indias merchandise exports at US $ 450.4 billion in 2022-23 grew by 6.7 percent as compared with 44.6 percent in the previous year.
b. Indias merchandise imports at US $ 613.1 billion in 2022-23 grew by 4.4 percent as compared with 30.3 percent in the previous year.

(1) Only a is incorrect
(2) Only b is incorrect
(3) Both a and b are incorrect
(4) None of the above are incorrect

**4.** ‘ट्रिम्स’ संदर्भातील पुढीलपैकी कोणत्या बाबी जागतिक व्यापार संघटनेच्या नियमांशी जुळणाऱ्या नाहीत ?
a. स्थानिक कच्च्या मालाची आवश्यकता
b. व्यापार संतुलनाची आवश्यकता
c. विदेशी चलनाची आवश्यकता
d. देशांतर्गत विक्रीची आवश्यकता
(1) a आणि c (2) b आणि d (3) a आणि b (4) a, b, c आणि d

Which of the following TRIMS is/are inconsistent with the WTO Articles ?
a. Local content requirements
b. Trade balancing requirements
c. Foreign exchange requirements
d. Domestic sales requirements
(1) a and c (2) b and d (3) a and b (4) a, b, c and d

---

**5.** खालील विधाने विचारात घ्या.
a. 2015 शाश्वत विकास उद्दिष्टांची संख्या 30 इतकी होती.
b. स्वैच्छिक राष्ट्रीय पुनरावलोकन अहवाल 2017 सात शाश्वत विकास लक्ष्यांवर केंद्रित आहे.
वरीलपैकी कोणते/ती विधान योग्य आहे/त ?
(1) फक्त a योग्य आहे (2) फक्त b योग्य आहे
(3) दोन्ही a आणि b योग्य आहेत (4) वरीलपैकी कोणतेही नाही

Consider the following statements :
a. In 2015 the number of Sustainable Development Goals was 30.
b. The Voluntary National Review Report 2017 focused on 7 sustainable Development Goals.
Which of the statement/s given above is/are correct ?
(1) Only a is correct (2) Only b is correct
(3) Both a and b are correct (4) None of the above

---

**6.** खालीलपैकी कोणते/ती विधान/ने बरोबर आहे/त ?
a. आर्थिक वर्ष 2018 पासून रेल्वे अर्थसंकल्प केंद्रीय अर्थ संकल्पात विलीन करण्यात आला.
b. अर्थ संकल्पीय आर्थिक वर्ष 2019 मध्ये सरकारी खर्चाचे नियोजन आणि नियोजनेत्तर वर्गीकरण करणे बंद झाले आहे.
(1) फक्त a बरोबर आहे (2) फक्त b बरोबर आहे
(3) दोन्ही a आणि b बरोबर आहेत (4) वरीलपैकी कोणतेही नाही

Which of the following statement/s is /are correct ?
a. The railway budget was merged with Union Budget from financial year 2018.
b. The Budget financial year 2019 discontinued having plan and Non-plan classification of Government expenditure.
(1) Only a is correct (2) Only b is correct
(3) Both a and b are correct (4) None of the above

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

7. खालीलपैकी कोणते/ती विधान/ने चूक आहे/त ?

a. 1968 मध्ये प्रथम भेट कर लागू करण्यात आला.

b. 1 एप्रिल, 1991 रोजी किंवा त्यानंतरच्या भेटवस्तूंवर भेट कर रद्द करण्यात आला.

(1) केवळ a चूक आहे (2) केवळ b चूक आहे

(3) दोन्ही a आणि b चूक आहेत (4) वरीलपैकी नाही

Which of the following statement/s is /are incorrect ?

a. A Gift Tax was first introduced in 1968.

b. Gift Tax was abolished on gifts made on or after April 1, 1991.

(1) Only a is incorrect (2) Only b is incorrect

(3) Both a and b are incorrect (4) None of the above

---

8. पूर्ण स्पर्धेतील करभारा संदर्भात खालील विधानांचा विचार करा.

a. इतर परिस्थिती कायम असताना, जर पुरवठ्याची लवचिकता ही मागणीच्या लवचिकतेपेक्षा अधिक असेल तर कराचा भार हा विक्रेत्यावर अधिक राहतो.

b. इतर परिस्थिती कायम असताना, जर मागणीची लवचिकता ही पुरवठ्याच्या लवचिकतेपेक्षा अधिक असेल तर कराचा भार हा ग्राहकांवर अधिक राहील.

वरीलपैकी कोणते/ती विधान/ने बरोबर आहेत?

(1) फक्त a बरोबर आहे (2) फक्त b बरोबर आहे

(3) a आणि b दोन्ही बरोबर आहेत (4) वरीलपैकी कोणतेही बरोबर नाहीत

Consider the following statements with respect to incidence of tax under perfect competition.

a. Other things being equal, the incidence of tax will be more on sellers if elasticity of supply is greater than elasticity of demand.

b. Other things being equal, if the elasticity of demand is greater than elasticity of supply, greater will be the incidence of tax on buyers.

Which of the statement/s given above is/are correct ?

(1) Only a is correct (2) Only b is correct

(3) Both a and b are correct (4) None of the above are correct

---

9. भारतासारख्या विकसनशील देशात राष्ट्रीय उत्पन्न मोजण्यात खालीलपैकी कोणत्या अडचणी आहेत ?

a. असंघटीत आणि विखुरलेले उत्पादन
b. निर्वाह शेती
c. पुरेशा सांख्यिकीय आकडेवारीची उपलब्धता
d. निरक्षरता

(1) a, b आणि c (2) a, b आणि d
(3) b, c आणि d (4) वरीलपैकी सर्व

Which of the following difficulties are in measuring National Income in developing countries like India ?

a. Unorganised and Scattered Production
b. Subsistence farming
c. Availability of adequate statistical data
d. Illiteracy

(1) a, b and c (2) a, b and d
(3) b, c and d (4) All of the above

---

10. व्यापार चक्रांच्या संदर्भात खालील विधाने विचारात घ्या.

a. एकापाठोपाठ एक अशा येणाऱ्या आर्थिक क्रियातील वाढ आणि घसरणीच्या अवस्थांना व्यापार चक्रे असे म्हटले जाते.
b. केन्सच्या मते, आर्थिक क्रियातील चढउतार हे एकूण प्रभावी मागणीतील चढउतारांमुळे निर्माण होतात.
c. सर्वसाधारणपणे व्यापार चक्राच्या तीन अवस्था असतात त्या म्हणजे वाढ, शिखर आणि घसरण

वरीलपैकी कोणती विधाने बरोबर आहेत ?

(1) a आणि b बरोबर आहेत (2) फक्त a बरोबर आहे
(3) फक्त b बरोबर आहे (4) a आणि c बरोबर आहेत

Consider the following statements about business cycles.

a. The alternating periods of expansion and contraction in economic activity are called business cycles.
b. According to Keynes, the fluctuations in economic activity are due to fluctuations in aggregate effective demand.
c. Generally business cycles have three phases, viz, expansion, peak and contraction.

Which of the above statements are correct ?

(1) a and b are correct (2) Only a is correct
(3) Only b is correct (4) a and c are correct

11. खालील विधाने विचारात घ्या.

a. वैयक्तिक उत्पन्नामध्ये नफा, व्याज, वेतन, खंड आणि सामाजिक सुरक्षा योगदाने यांचा समावेश होतो.

b. व्ययशक्य उत्पन्नामध्ये वैयक्तिक उत्पन्न आणि वैयक्तिक कर यांचा समावेश होतो.

वरीलपैकी कोणते/ती विधान/ने चूक आहे/त ?

(1) केवळ a चूक आहे (2) केवळ b चूक आहे

(3) दोन्ही a आणि b चूक आहेत (4) वरीलपैकी कोणतेही नाही

Consider the following statements.

a. Personal Income includes profit, interest, wages, rent and social security contributions.

b. Disposable Income includes personal income and personal taxes.

Which of the statement/s given above is/are incorrect ?

(1) Only a is incorrect (2) Only b is incorrect

(3) Both a and b are incorrect (4) None of the above

---

12. केन्स यांचा उत्पन्न व रोजगार सिद्धांत असे गृहीत धरतो की

(1) वेतन आणि किंमती स्थिर असतात

(2) वेतन आणि किंमती अस्थिर असतात

(3) मजूरी आणि उपभोग स्थिर असतो

(4) उत्पन्न आणि उपभोग स्थिर असतो

Keyne's theory of income and employment assumes that

(1) Wages and prices remain constant

(2) Wages and prices remain unconstant

(3) Wages and consumption remain constant

(4) Income and consumption remain constant

---

13. युनसीटीएडीच्या जागतिक गुंतवणूक अहवालानुसार (2022) भारत 2021 मध्ये एफडीआय प्राप्त करण्यात ________ व्या क्रमांकावर होता.

(1) 6 व्या (2) 7 व्या

(3) 8 व्या (4) वरीलपैकी नाही

According to the UNCTAD's World Investment Report (2022), India was ______ recipient of FDI in 2021.

(1) $6^{th}$ (2) $7^{th}$

(3) $8^{th}$ (4) None of the above

**14.** पैशाची कार्ये या संदर्भात पुढीलपैकी कोणती/कोणते विधाने/विधान चूकीचे आहे/आहेत ?

a. विनिमय माध्यम हे पैशाचे दुय्यम कार्य आहे.

b. पॉल इन्झींगच्या मते पैशाची दुय्यम स्वरुपाची कार्ये ही गतिशील कार्ये आहेत.

(1) a आणि b (2) केवळ a
(3) केवळ b (4) वरीलपैकी कोणतेही नाही

Which of the following statement/s is/are false in reference to functions of money ?

a. Medium of exchange is a secondary function of money.

b. According to Paul Einzing secondary functions of money are dynamic functions.

(1) a and b (2) Only a
(3) Only b (4) None of the above

---

**15.** खालीलपैकी कोणत्या समितीने दारिद्र्याची व्याख्या ही उष्मांकांवर (Calories) आधारित नसावी अशी सूचना केली ?

(1) लकडावाला समिती (2) दांतवाला समिती
(3) तेंडुलकर समिती (4) रंगराजन समिती

Which of the following committees on measurement of poverty, suggested to move away from Calories based definition of poverty ?

(1) Lakdawala Committee (2) Dantwala Committee
(3) Tendulkar Committee (4) Rangarajan Committee

---

**16.** खालीलपैकी कोणते 'गुणवस्तू' (merit goods) चे उदाहरण आहे ?

(1) दारिद्र्यरेषेखालील कुटुंबासाठी सार्वजनिक वितरण व्यवस्था
(2) शेतकऱ्यांना वीज वापरावर दिलेले अनुदान
(3) सार्वजनिक बगीचा
(4) वरीलपैकी सर्व

Which of the following is an example of merit goods ?

(1) Public distribution system for below poverty line families
(2) Subsidies granted to farmers on electricity
(3) Public Park
(4) All of the above

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

**17.** फिलिप्स वक्र चलनवाढ आणि ______ यांच्यातील व्यस्त संबंध दर्शविते.

(1) व्यापार संतूलन
(2) अर्थव्यवस्थेतील वाढीचा दर
(3) किंमत वाढीचा दर
(4) बेरोजगारी

The Phillips curve shows the inverse relationship between inflation and

(1) The balance of trade
(2) The rate of growth in an economy
(3) The rate of price increases
(4) Unemployment

---

**18.** जोड्या जुळवा.

| | गट अ | | गट ब |
|---|---|---|---|
| a. | सामान्य मुख्य स्थिती बेरोजगारी | i. | पूर्ण सप्ताहामध्ये बेरोजगार |
| b. | साप्ताहिक स्थिती बेरोजगारी | ii. | खुली बेरोजगारी |
| c. | चालू दैनिक स्थिती बेरोजगारी | iii. | सप्ताहामधील काही दिवस बेरोजगार |

| | a | b | c |
|---|---|---|---|
| (1) | ii | i | iii |
| (2) | i | iii | ii |
| (3) | ii | iii | i |
| (4) | i | ii | iii |

Match the following :

| | Group A | | Group B |
|---|---|---|---|
| a. | Usual Principal Status Unemployment | i. | Unemployed for whole week |
| b. | Weekly Status Unemployment | ii. | Open Unemployment |
| c. | Current Daily Status Unemployment | iii. | Unemployed for some days in a week |

| | a | b | c |
|---|---|---|---|
| (1) | ii | i | iii |
| (2) | i | iii | ii |
| (3) | ii | iii | i |
| (4) | i | ii | iii |

**19.** लोकसंख्या संक्रमणाच्या सिद्धांताच्या दूसऱ्या अवस्थेचे वैशिष्ट्ये म्हणजे __________ होय.

(1) उच्च जन्म आणि उच्च मृत्यू दर

(2) उच्च मृत्यू दर

(3) उच्च जन्म दर आणि घसरणारा मृत्यू दर

(4) अल्प जन्म दर आणि उच्च मृत्यू दर

The Second Stage of Theory of Demographic Transition is characterised by

(1) High birth and high death rate

(2) High death rate

(3) High birth rate and falling death rate

(4) Low birth rate and high death rate

---

**20.** मानव विकास निर्देशांका संदर्भात पुढीलपैकी कोणते/ती विधान/विधाने सत्य आहेत ?

a. पहिला मानव विकास निर्देशांक अहवाल महबुब-उल-हक यांच्या नेतृत्वाखाली तयार झाला आणि तो 1990 मध्ये प्रकाशित करण्यात आला.

b. 'जन्माच्या वेळचे वजन' या आधारे मोजले जाणारे आरोग्य हा मानव विकास निर्देशांकाचा एक महत्वाचा घटक आहे.

(1) a आणि b (2) केवळ a

(3) केवळ b (4) वरीलपैकी कोणतेही नाही

Which of the following statements regarding HDI is/are true ?

a. The first HDI report was prepared under the stewardship of Mahboob-Ul-Haq and published in 1990.

b. Health measured in terms of 'weight at birth' is one of the important component of HDI.

(1) a and b (2) Only a

(3) Only b (4) None of the above

---

**21.** खालील विधाने विचारात घ्या.

a. प्रा.एच.डब्लू. सिंगर यांनी म्हटले आहे की लोकसंख्या वाढीचा आर्थिक विकासाच्या दरावर सकारात्मक परिणाम होतो.

b. प्रा. लिबेन्स्टाईन, लोकसंख्या वाढीचा दर दरडोई उत्पन्नाचा एक महत्वाचा निर्धारक मानतात.

वरीलपैकी कोणते/ती विधान/ने योग्य आहे/त ?

(1) दोन्ही a आणि b योग्य आहेत (2) फक्त a योग्य आहे

(3) फक्त b योग्य आहे (4) वरीलपैकी कोणतेही योग्य नाही

Consider the following statements.

a. Prof. H.W. Singer has stated that population growth has a positive effect on the rate of economic development.

b. Prof. Leibenstein considers the rate of population growth as an important determinant of per capita income.

Which of the statement/s given above is/are correct ?

(1) Both a and b are correct (2) Only a is correct

(3) Only b is correct (4) None of the above are correct

---

**22.** खालीलपैकी कोणते/ती विधान/ने बरोबर आहे/त ?

a. 2022-23 मध्ये शेतमजुरांसाठी सीपीआयवर आधारित महागाई 6.8 टक्के होती.

b. 2022-23 मध्ये ग्रामीण मजुरांसाठी सीपीआयवर आधारित महागाई 7.0 टक्के होती.

(1) फक्त a बरोबर आहे (2) फक्त b बरोबर आहे

(3) दोन्ही a आणि b बरोबर आहेत (4) वरीलपैकी कोणतेही बरोबर नाही

Which of the following statement/s is /are correct ?

a. Inflation based on CPI for agricultural labourers was 6.8 percent during 2022-23.

b. Inflation based on CPI for rural labourers was 7.0 percent during 2022-23.

(1) Only a is correct (2) Only b is correct

(3) Both a and b are correct (4) None of the above are correct

---

**23.** भारतातील ठेवींच्या संदर्भात खालील विधाने विचारात घ्या.

a. 2022-23 मध्ये पोस्ट ऑफिस मधील एकूण ठेवी बँकांमधील वेळेच्या ठेवींपेक्षा जास्त होत्या.

b. 2022-23 मध्ये भारतीय रिझर्व्ह बँकेच्या इतर ठेवींपेक्षा पोस्ट ऑफिस बचत ठेवी जास्त होत्या.

वरीलपैकी कोणते/ती विधान/ने योग्य आहे/त?

(1) फक्त a योग्य आहे
(2) फक्त b योग्य आहे
(3) दोन्ही a आणि b योग्य आहेत
(4) वरीलपैकी कोणतेही योग्य नाही

Consider the following statements in the context of deposits in India.

a. During 2022-23 the total post office deposits was higher than time deposits with banks.

b. Post office saving bank deposits was higher than 'other' deposits with Reserve Bank of India in 2022-23.

Which of the statement/s given above is /are correct ?

(1) Only a is correct
(2) Only b is correct
(3) Both a and b are correct
(4) None of above are correct

---

**24.** केन्सच्या मते, कोणत्या हेतूसाठी पैशाची मागणी केली जाते ?

a. व्यवहार हेतू
b. दक्षता हेतू
c. सट्टेबाजी हेतू
d. बचत हेतू

(1) a, b आणि d
(2) b, c आणि d
(3) a, b आणि c
(4) वरीलपैकी सर्व

According to Keynes, money is demanded for what motives ?

a. Transaction motive
b. Precautionary motive
c. Speculative motive
d. Saving motive

(1) a, b and d
(2) b, c and d
(3) a, b and c
(4) All of the above

**25.** चलनवाढीचा संरचनात्मक सिद्धांत _________ यांनी मांडला होता.

a. जी. मिर्डाल
b. जे. केन्स
c. एम. फ्रिडमन
d. पी. स्ट्रीटेन

(1) a आणि b (2) b आणि c (3) a आणि d (4) b आणि d

The structural theory of Inflation was proposed by

a. G. Myrdal
b. J. Keynes
c. M. Friedmen
d. P. Streeten

(1) a and b (2) b and c (3) a and d (4) b and d

---

**26.** खालीलपैकी कोणते/ती विधान/ने योग्य आहे/त ?

a. मानव विकास निर्देशांक अहवाल 2010 ने दोन जागतिक निर्देशांक सुरू केले–लिंग सबलीकरण उपाय आणि लिंग असमानता निर्देशांक.
b. लिंग सबलीकरणाच्या उपायाने स्त्रीया आर्थिक आणि राजकीय जीवनात सक्रीयपणे भाग घेण्यास सक्षम आहेत की नाही हे सूचित होते.

(1) केवळ a योग्य आहे
(2) दोन्ही a आणि b योग्य आहेत
(3) केवळ b योग्य आहे
(4) वरीलपैकी कोणतेही योग्य नाही

Which of the following statement/s is/are correct ?

a. Human Development Index Report 2010 launched two global indices- Gender Empowerment measure and Gender Inequality Index.
b. The Gender Empowerment Measure indicated whether women are able to actively participate in economic and political life.

(1) Only a is correct
(2) Both a and b are correct
(3) Only b is correct
(4) None of the above are correct

27. आर.एफ.हॅरॉडने त्याच्या आर्थिक विकासाच्या प्रतिमानासाठी खालीलपैकी कोणत्या विकास दराच्या वेगवेगळ्या संकल्पना वापरल्या आहेत ?

a. वास्तविक वाढीचा दर
b. हमी वाढीचा दर
c. वार्षिक वाढीचा दर
d. नैसर्गिक वाढीचा दर

(1) a, b आणि c (2) b, c आणि d
(3) a, b आणि d (4) वरीलपैकी सर्व

Which of the following distinct concepts rates of growth are used by R.F. Harrod for his economic growth model ?

a. Actual Rate of Growth
b. Warranted Rate of Growth
c. Annual Rate of Growth
d. Natural Rate of Growth

(1) a, b and c (2) b, c and d
(3) a, b and d (4) All of the above

---

28. खालील विधाने विचारात घ्या.

a. सायमन कुझनेट्सच्या इनव्हर्टेड-U गृहीतकानुसार, उत्पन्नातील असमानता प्रथम वाढते आणि नंतर एक देश जसजसा विकसित होतो तसतसे कमी होते.
b. सायमन कुझनेट्स यांनी नमूद केले की 1913 ते 1948 दरम्यान यूएसए मध्ये समानतेत लक्षणीय घट झाली आहे.

वरीलपैकी कोणते/ती विधान/ने चूक आहे/आहेत ?

(1) दोन्ही a आणि b चूक आहेत (2) फक्त b चूक आहे
(3) फक्त a चूक आहे (4) वरीलपैकी नाही

Consider the following statements :

a. According to Simon Kuznet's inverted-U Hypothesis, income inequality first rises and then falls as a country develop over time.
b. Simon Kuznets noted that a marked equality decline had taken place in the USA between 1913 and 1948.

Which of the statement/s given above is/are incorrect ?

(1) Both a and b are incorrect (2) Only b is incorrect
(3) Only a is incorrect (4) None of the above

---

29. खालीलपैकी कोणते एचडीआय मानव विकास अहवाल 2020 द्वारे सादर केला गेला ?
(1) लिंग असमानता निर्देशांक एचडीआय
(2) ग्रहांचा दाब समायोजित एचडीआय
(3) मानवी गरीबी एचडीआय
(4) लिंग संबंधीत विकास एचडीआय

Which of the following HDI was introduced by Human Development Report 2020 ?
(1) Gender Inequality Index HDI
(2) Planetary Pressure Adjusted HDI
(3) Human Poverty HDI
(4) Gender related Development HDI

---

30. प्रधानमंत्री पिक विमा योजनेची वैशिष्ट्ये खालीलपैकी कोणती आहेत ?
a. या योजनेची अंमलबजावणी 1 एप्रिल 2016 पासून करण्यात आली.
b. या योजनेंतर्गत योजनेत समाविष्ट झालेल्या एखाद्या विशिष्ट गावातील शेतकऱ्यांच्या पिकाचे नुकसान झाले तर त्याला नुकसान भरपाई मिळू शकत नाही.
c. या योजनेतील सहभागी शेतकऱ्यांना पिकाचे नुकसान झाल्यास नुकसान भरपाईची रक्कम त्याच्या बँक खात्यावर जमा होते.
d. या योजनेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार शेतकऱ्यांनी संबंधित पिकाचा विमा उतरविला असेल व त्या पिकाचे नुकसान झाले तर 24 तासात नुकसानीचा अहवाल देणे आवश्यक आहे.

(1) विधान a आणि c
(2) विधान a, b आणि c
(3) विधान a, c आणि d
(4) विधान a, b, c आणि d

Which of the following are characteristics of Pradhan Mantri Fasal Bima Yojana ?
a. The implementation of this scheme started from $1^{st}$ April 2016.
b. As per this scheme if the farmers take the crop insurance and a farmer's crop is damaged in a specific village, he will not get the benefit of insurance.
c. The farmer participated in this scheme will get the benefit of crop loss directly in bank account.
d. As per operational guidelines of this scheme, if the farmers have taken the insurance of concerned crop and the crop is damaged, then they should report crop loss within 24 hours.

(1) Statement a and c
(2) Statement a, b and c
(3) Statement a, c and d
(4) Statement a, b, c and d

**31.** योग्य जोड्या जुळवा :

| स्तंभ – I | | स्तंभ – II | |
|---|---|---|---|
| a. | अंबर बॉक्स | i. | मानव विकासाचे घटक |
| b. | सामाजिक आणि विकास बॉक्स | ii. | अन्न सुरक्षेसाठी सार्वजनिक साठवण-क्षमता |
| c. | निळा बॉक्स | iii. | किमान आधारभूत किंमत |
| d. | ग्रीन बॉक्स | iv. | ग्रामीण विकास |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (1) | iii | iv | ii | i |
| (2) | iii | i | iv | ii |
| (3) | iv | iii | ii | i |
| (4) | iii | ii | i | iv |

Match the following :

| Unit – I | | Unit – II | |
|---|---|---|---|
| a. | Amber Box | i. | Human Development issues |
| b. | Social and Development Box (S and D Box) | ii. | Public storage for food security |
| c. | Blue Box | iii. | Minimum support prices |
| d. | Green Box | iv. | Rural Development |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (1) | iii | iv | ii | i |
| (2) | iii | i | iv | ii |
| (3) | iv | iii | ii | i |
| (4) | iii | ii | i | iv |

---

**32.** खालील विधाने विचारात घ्या.

a. मे 2021 मध्ये भारत सरकारने प्रधानमंत्री मत्स्य संपदा योजना सुरू केली.

b. प्रधानमंत्री मत्स्य संपदा योजना 2021 ते 2025 या पाच वर्षात फक्त सर्व राज्यांमध्ये राबविली जाणार आहे.

(1) दोन्ही a आणि b चूक आहेत (2) फक्त a चूक आहे

(3) फक्त b चूक आहे (4) वरीलपैकी कोणतेही चूक नाही

Consider the following statements.

a. In May 2021 the Government of India have launched Pradhan Mantri Matsya Sampada Yojana.

b. Pradhan Mantri Matsya Sampada Yojana is to be implemented over Five Years from 2021 to 2025 in all states only.

(1) Both a and b are incorrect (2) Only a is incorrect

(3) Only b is incorrect (4) None of the above are incorrect

---

**33.** भारतीय शेतीच्या अल्प उत्पादकतेची कारणे खालीलपैकी कोणती आहेत ?

a. सिंचनाच्या अपुऱ्या सुविधा.
b. कालबाह्य कृषी तंत्रज्ञान.
c. कृषी क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांची कमी संख्या.
d. कृषीक्षेत्रातील अनार्थिक धारणक्षेत्र.

(1) a आणि c (2) b आणि d (3) c आणि d (4) a, b आणि d

Which of the following are the causes of low productivity in Indian Agriculture ?

a. Lack of Irrigation facilities.
b. Outdated agricultural technology.
c. Less number of persons working in Agriculture sector.
d. Uneconomic holdings in agriculture sector.

(1) a and c (2) b and d (3) c and d (4) a, b and d

---

**34.** बहुआयामी दारिद्र्य निर्देशांका बाबतीत खालीलपैकी कोणते विधान/विधाने अचूक आहेत ?

a. बहुआयामी दारिद्र्य निर्देशांकाची संकल्पना 2010 च्या मानव विकास अहवालात मांडण्यात आली.
b. बहुआयामी दारिद्र्य निर्देशांक ही संकल्पना मानवी दारिद्र्य निर्देशांकाच्या ऐवजी वापरण्यात आली.
c. बहुआयामी दारिद्र्य निर्देशांकामध्ये आरोग्य, शिक्षण, राहणीमानाचा दर्जा याबाबतीतील व्यक्तिची वंचितता विचारात घेतली जाते.
d. बहुआयामी दारिद्र्य निर्देशांकाचे मूल्य जेवढे अधिक तेवढे दारिद्र्याचे प्रमाण अधिक.

(1) विधान c (2) विधान b व c
(3) विधान a आणि c (4) विधान a, b, c आणि d

In case of Multidimensional Poverty Index which of the following statement/s are correct ?

a. The concept of Multidimensional Poverty Index was presented in Human Development Report of 2010.
b. The concept of Multidimensional Poverty Index is used in the place of Human Poverty Index.
c. In Multidimensional Poverty Index the deprivation of the person of health, education, living standard were taken into consideration.
d. Higher value of Multidimensional Poverty Index indicates higher proportion of poverty.

(1) Statement c (2) Statement b and c
(3) Statement a and c (4) Statement a, b, c and d

35. खालील विधाने विचारात घ्या.

a. संघटीत कामगारांना वृद्धापकालीन संरक्षण व सामाजिक सुरक्षा देण्यासाठी 2019 मध्ये प्रधानमंत्री श्रमयोगी मान–धन योजना सुरू करण्यात आली.

b. महाराष्ट्रात या योजनेंतर्गत 6,03,685 संघटीत कामगारांची दि 31 डिसेंबर, 2022 पर्यंत नोंदणी झालेली आहे.

(1) फक्त a चूक आहे (2) फक्त b चूक आहे

(3) दोन्ही a आणि b चूक आहेत (4) वरीलपैकी कोणतेही चूक नाही

Consider the following statement.

a. Pradhan Mantri Shram Yogi Maan-dhan Yojana was launched in 2019 for old age protection and social security to organised workers.

b. As on 31st December, 2022 in all 6,03,685 organised workers have registered under this scheme in the Maharashtra.

(1) Only a is incorrect (2) Only b is incorrect

(3) Both a and b are incorrect (4) None of the above are incorrect

---

36. खालील विधाने विचारात घ्या.

a. जुलै 2020 – जून 2021 मध्ये राजस्थानचा नागरी बेरोजगारीचा दर देशात सर्वाधिक होता.

b. जुलै 2020 – जून 2021 मध्ये सिक्कीमचा नागरी बेरोजगारीचा दर देशात सर्वात कमी होता.

(1) दोन्ही a आणि b योग्य आहेत (2) फक्त b योग्य आहे

(3) फक्त a योग्य आहे (4) वरीलपैकी कोणतेही योग्य नाही

Consider the following statements.

a. Rajasthan had the highest urban unemployment rate in the country during July 2020 – June 2021.

b. Sikkim had the lowest urban unemployment rate in the country during July 2020 – June 2021.

(1) Both a and b are correct (2) Only b is correct

(3) Only a is correct (4) None of the above are correct

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

37. खालीलपैकी कोणते विधान बरोबर आहे ?

a. भगवती समितीच्या अहवालानुसार (1973) सरकारने देशातील बेकारी दूर करण्यासाठी विविध उपाय योजनांची अंमलबजावणी केली.

b. देशातील बेकारी कमी करण्यासाठी क्षेत्र विकास योजना राबवली गेली.

c. बेकारी कमी करण्यासाठी लहान शेतकरी विकास संस्था (SFDA) योजना सुरू केली गेली.

(1) फक्त a (2) फक्त b (3) a, b आणि c (4) b आणि c

Which of the following statement is correct ?

a. According to Bhagwati Committee Report (1973), the Government implemented various Scheme's to reduce the unemployment in the country.

b. Area Development Scheme was implemented to reduce the unemployment in the country.

c. Small Farmers Development Agencies Scheme was introduced to reduce unemployment.

(1) Only a (2) Only b (3) a, b and c (4) b and c

---

38. ''मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजनेच्या'' बाबतीत खालीलपैकी कोणते विधान/विधाने सत्य आहेत ?

a. महाराष्ट्र सरकारने ही योजना 2021-22 मध्ये सुरू केली.

b. या योजनेचा मुख्य उद्देश–कृषी पंपासाठी दिवसा वीज उपलब्ध करून देणे व प्रदूषण कमी करण्यासाठी डिझेलवरील पंपाऐवजी सौर पंपाचा वापर करणे हा आहे.

c. या योजनेचा फायदा घेण्यासाठी अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीतील लोकांनी एकूण खर्चाच्या 10% रक्कम स्वत: भरणे आवश्यक आहे.

d. ही योजना महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड मार्फत राबविली जाते.

(1) विधान a आणि b (2) विधान b आणि d

(3) विधान b, c आणि d (4) विधान a, b, c आणि d

In case of "Mukhyamantri Solar Krishi Pump Yojana" which of the following statement(s) is/are correct ?

a. Government of Maharashtra has launched this scheme in 2021-22.

b. The main objectives of this scheme is to make available the electricity to agricultural pumps during day and to decrease the pollution by using solar pump instead of diesel pumps.

c. For taking the benefit of this scheme S.C. and S.T. persons must pay 10% amount of total cost.

d. This scheme is implemented by Maharashtra State Electricity Distribution Company Limited.

(1) Statement a and b (2) Statement b and d

(3) Statement b, c and d (4) Statement a, b, c and d

---

**39.** महाराष्ट्र सरकारच्या 2019 च्या औद्योगीक धोरणाची उद्दिष्टे खालीलपैकी कोणती आहेत ?

a. व्यावसायिक पर्यावरण निर्माण करून औद्योगिक गुंतवणूक वाढविणे.

b. राज्यामध्ये मोठ्या उद्योगधंद्यांचा विकास घडवून आणून रोजगारनिर्मितीचे प्रमाण वाढविणे.

c. सर्वसमावेशक, संतुलित आणि शाश्वत विकास घडवून आणणे.

(1) a आणि b (2) b आणि c

(3) a आणि c (4) a, b आणि c

Which of the following are objectives of Maharashtra's Industrial Policy 2019 ?

a. To increase industrial investment by creating business environment.

b. To increase the proportion of employment generation in state by the development of large scale industries.

c. To bring about inclusive, balanced and sustainable development.

(1) a and b (2) b and c

(3) a and c (4) a, b and c

---

**40.** खालील विधाने विचारात घ्या व योग्य पर्याय निवडा.

a. 2022-23 दरम्यान ई–नाम पोर्टलमध्ये महाराष्ट्रातील 118 एपीएमसीस् समाविष्ट आहेत.

b. 2022-23 दरम्यान, 77 एपीएमसीस् मध्ये ऑनलाईन गेट एन्ट्री, ई–लिलाव सुरू करण्यात आले आहे.

(1) फक्त b योग्य आहे

(2) दोन्ही a आणि b योग्य आहेत

(3) फक्त a योग्य आहे

(4) वरीलपैकी कोणतेही योग्य नाही

Consider the following statements and choose correct option.

a. During 2022-23, 118 APMCs in the Maharashtra have been included under e-NAM Portal.

b. During 2022-23, online gate entry, e-auction have been started in 77 APMCs.

(1) Only b is correct

(2) Both a and b are correct

(3) Only a is correct

(4) None of the above are correct

---

कच्च्या कामासाठी जागा / **SPACE FOR ROUGH WORK**

41. खालील घटकांच्या बाबतीत महाराष्ट्राची भारताशी तुलना करून सत्य विधाने ओळखा.

a. 2019 – 20 मध्ये महाराष्ट्रात स्थूल पिकाखालील क्षेत्राचे प्रमाण भारताच्या स्थूल पिकाखालील क्षेत्राच्या 11.2% इतके होते.

b. 2011 च्या जणगणनेनुसार भारताच्या एकूण लोकसंख्येच्या 7.3% लोकसंख्या महाराष्ट्रात होती.

c. 2021 मध्ये भारतातील एकूण वनाखालील क्षेत्राच्या 8% क्षेत्र महाराष्ट्रात आहे.

d. 2021 – 22 मध्ये भारतात निर्माण होणाऱ्या एकूण वीजनिर्मितीपैकी 8.9% वीज महाराष्ट्रात निर्माण झाली.

(1) विधान a, b आणि d (2) विधान b, c आणि d

(3) विधान a, c आणि d (4) विधान a, b, c आणि d

Compare the Maharashtra with India on the basis of following factors and find out the true statements.

a. In 2019 – 20 the proportion of Maharashtra's Gross cropped area was 11.2% to Indias gross cropped area.

b. As per 2011 census, India's 7.3% population was lives in Maharashtra.

c. In 2021, out of India's total forest area 8% area in Maharashtra.

d. In 2021 – 22, out of India's total electricity generation 8.9% electricity was generated in Maharashtra.

(1) Statement a, b and d (2) Statement b, c and d

(3) Statement a, c and d (4) Statement a, b, c and d

---

42. खालीलपैकी प्रादेशिक असमतोलाचे निदर्शक कोणते ?

a. निव्वळ राज्यांतर्गत उत्पादन.

b. राज्यातील लोकांचे दरडोई उत्पन्न.

c. दरडोई विजेचा वापर.

d. प्रति 1000 व्यक्तींमागे नोंदणीकृत वाहनांची संख्या.

(1) पर्याय b आणि a (2) पर्याय a, b आणि c

(3) पर्याय b आणि c (4) पर्याय a, b, c आणि d

Which of the following are indicators of Regional Imbalance ?

a. Net State Domestic Product.

b. Per Capita Income of the people in State.

c. Per Capita Consumption of Electricity.

d. Registered vehicles per 1000 persons.

(1) Option b and a (2) Option a, b and c

(3) Option b and c (4) Option a, b, c and d

43. भारत निर्माण कार्यक्रम, 2005 मध्ये खालीलपैकी कोणत्या पायाभूत सुविधांवर भर देण्यात आला ?

a. ग्रामीण रस्ते व जलसिंचन.
b. ग्रामीण घरे.
c. ग्रामीण पाणीपुरवठा.
d. शहरी विद्युतीकरण आणि टेलिफोन.

(1) a आणि d (2) a, b आणि c
(3) b, c आणि d (4) a, b, c आणि d

In Bharat Nirman Programme, 2005 which of the following infrastructural facilities were given more weightage ?

a. Rural Roads and Irrigation.
b. Rural Housing.
c. Rural water supply.
d. Urban Electrification and Telephones.

(1) a and d (2) a, b and c
(3) b, c and d (4) a, b, c and d

---

44. 1995 मध्ये मँचेस्टर येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेच्या परिषदेत खालीलपैकी कोणती सहकाराची तत्वे सुचविली होती ?

a. सहकारांतर्गत सहकार.
b. समाजा बद्दलचे कर्तव्य.
c. राजकीय आणि धार्मिक तटस्थता.
d. रोखीचे व्यवहार.

(1) a आणि b (2) a आणि c (3) b आणि c (4) c आणि d

Which of the following principles of Cooperation were suggested by International Cooperative Alliance Council held at Manchester in 1995 ?

a. Cooperation among Cooperatives.
b. Concern for Community.
c. Political and Religious Neutrality.
d. Cash Trading.

(1) a and b (2) a and c (3) b and c (4) c and d

---

**45.** प्रमुख अन्नधान्य उत्पादक राज्यांमध्ये 2021 – 22 या वर्षातील अन्नधान्य उत्पादनानुसार खालील राज्यांची त्यांच्या क्रमवारीनुसार जुळवाजुळव करा.

| | राज्य | | क्रमवारी |
|---|---|---|---|
| a. | पंजाब | i. | पहिली |
| b. | राजस्थान | ii. | दुसरी |
| c. | मध्यप्रदेश | iii. | तीसरी |
| d. | उत्तरप्रदेश | iv. | चौथी |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (1) | iv | iii | i | ii |
| (2) | ii | i | iv | iii |
| (3) | ii | iii | i | iv |
| (4) | iii | iv | ii | i |

Match the following major food grain producing states as per their ranks according to Food grain production in the year of 2021 – 22.

| | State | | Rank |
|---|---|---|---|
| a. | Punjab | i. | First |
| b. | Rajasthan | ii. | Second |
| c. | Madhya Pradesh | iii. | Third |
| d. | Uttar Pradesh | iv. | Fourth |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (1) | iv | iii | i | ii |
| (2) | ii | i | iv | iii |
| (3) | ii | iii | i | iv |
| (4) | iii | iv | ii | i |

---

**46.** सहकारी शिक्षण आणि प्रशिक्षण देणाऱ्या खालीलपैकी कोणत्या संस्थाची दीर्घरूपे बरोबर आहेत ?

a. VAMNICOM – Vaikunth Mehta National Institute of Co-operative Management.
b. NCCIT – National Council of Co-operative Institutes.
c. PDVVPICOM – Padmbhushan Dr. Vitthalrao Vikhe Patil Institute of Co-operative Management.

(1) a, b आणि c (2) a आणि c (3) b आणि c (4) फक्त a

Which of the following Co-operative education and training institution's full forms are correct ?

a. VAMNICOM – Vaikunth Mehta National Institute of co-operative Management.
b. NCCIT – National Council of Co-operative Institutes.
c. PDVVPICOM – Padmbhushan Dr. Vitthalrao Vikhe Patil Institute of Co-operative Management.

(1) a, b and c (2) a and c (3) b and c (4) Only a

47. खालील विधाने विचारात घ्या व योग्य पर्याय निवडा.
   a. दि. 31 मार्च 2022 रोजी महाराष्ट्रात 175 नोंदणीकृत सहकारी साखर कारखाने होते.
   b. दि. 31 मार्च 2022 रोजी महाराष्ट्रात 20,897 प्राथमिक कृषी पत पुरवठा सहकारी संस्था होत्या.
   (1) केवळ a योग्य आहे (2) केवळ b योग्य आहे
   (3) दोन्ही a आणि b योग्य आहेत (4) वरीलपैकी कोणतेही योग्य नाही

   Consider the following statements and choose correct option.
   a. As on 31st March 2022 there were 175 registered co-operative sugar factories in the Maharashtra.
   b. As on 31st March 2022 there were 20,897 primary agricultural co-operative credit societies in the Maharashtra.
   (1) Only a is correct (2) Only b is correct
   (3) Both a and b are correct (4) None of the above are correct

---

48. __________ येथे सहकारी व्यवस्थापनाच्या प्रादेशिक संस्था स्थित आहेत.
   a. पुणे
   b. पाटणा
   c. मुंबई
   d. बेंगळुरू
   (1) a आणि b (2) b आणि d (3) a आणि c (4) a आणि d

   Regional Institutes of co-operative management are located at __________
   a. Pune
   b. Patna
   c. Mumbai
   d. Bengaluru
   (1) a and b (2) b and d (3) a and c (4) a and d

---

49. महाराष्ट्र इलेक्ट्रीक/विद्युत वाहन प्रोत्साहन धोरणाबद्दल खालील विधाने विचारात घ्या.
   a. याची घोषणा फेब्रुवारी 2018 मध्ये करण्यात आली.
   b. सुधारीत महाराष्ट्र इलेक्ट्रीक/विद्युत वाहन प्रोत्साहन धोरण सन 2022 मध्ये जाहीर करण्यात आले.
   (1) फक्त a बरोबर (2) फक्त b बरोबर
   (3) a आणि b दोन्ही बरोबर (4) a आणि b दोन्ही बरोबर नाही

   Consider the following statements about the Maharashtra Electric Vehicle Incentive Policy.
   a. It was announced in February 2018.
   b. The revised Maharashtra Electric Vehicle Policy was announced in year 2022.
   (1) Only a is correct (2) Only b is correct
   (3) Both a and b are correct (4) Neither a nor b is correct

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

50. त्रैवार्षिक सरासरी (2018 – 19 ते 2020 – 21) दरम्यान एकूण तृणधान्यांच्या प्रति हेक्टर उत्पन्नाच्या (किलोग्रॅम) संदर्भात खालील राज्यांची चढत्या क्रमाने मांडणी करा.

a. हरियाणा
b. आंध्रप्रदेश
c. पंजाब
d. महाराष्ट्र

(1) a, b, c, d (2) b, c, d, a
(3) d, a, b, c (4) d, b, a, c

Arrange the following states in ascending order in context of yield Per hectare (Kilogram) of total Cereals during triennial average (2018 – 19 to 2020 – 21) :

a. Haryana
b. Andhra Pradesh
c. Punjab
d. Maharashtra

(1) a, b, c, d (2) b, c, d, a
(3) d, a, b, c (4) d, b, a, c

---

51. खालील विधाने विचारात घ्या.

a. भारत शासनामार्फत 2005 – 06 मध्ये राष्ट्रीय फलोत्पादन अभियानाची सुरवात करण्यात आली.
b. 2015 – 16 पासून महाराष्ट्रातील 34 जिल्ह्यांत एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान राबविण्यात येत आहे.

(1) दोन्ही a आणि b योग्य आहेत (2) फक्त b योग्य आहे
(3) फक्त a योग्य आहे (4) वरीलपैकी कोणतेही योग्य नाही

Consider the following statement.

a. National Horticulture Mission was launched by Government of India in 2005 – 06.
b. From 2015 – 16, the mission for Integrated Development of Horticulture is implemented in 34 districts of Maharashtra.

(1) Both a and b are correct (2) Only b is correct
(3) Only a is correct (4) None of the above are correct

52. खालील विधाने विचारात घ्या.

a. सुधारित व्याज सबव्हेंशन योजना ही शेतकऱ्यांना अनुदानित व्याज दरात दीर्घकालीन पत पुरवठा करते.

b. या योजनेंतर्गत जर एखाद्या शेतकऱ्याने वेळेवर कर्जाची परतफेड केली तर त्याला वार्षिक 4 टक्के दराने कर्ज मिळते.

(1) केवळ a योग्य आहे

(2) केवळ b योग्य आहे

(3) दोन्ही a आणि b योग्य आहेत

(4) वरीलपैकी कोणतेही योग्य नाही

Consider the following statement.

a. Modified Interest Subvention Scheme provides long-term credit to farmer at subsidised interest rates.

b. Under this scheme if a farmer repays his loan on time, he gets credit at 4 percent per annum.

(1) Only a is correct

(2) Only b is correct

(3) Both a and b are correct

(4) None of the above are correct

---

53. गोपाल रत्न पुरस्कार ____________ साठी दिला जातो.

a. सर्वोत्तम ए आय तंत्रज्ञ.

b. सर्वोत्तम डेअरी शेतकरी.

c. सर्वोत्तम दूध उत्पादक कंपनी.

d. सर्वोत्तम सहकारी डेअरी.

(1) a, b आणि d

(2) b, c आणि d

(3) a आणि b

(4) वरीलपैकी सर्व

Gopal Ratna Award is given for ____________

a. Best AI technician.

b. Best dairy Farmer.

c. Best Milk Produce Company.

d. Best Dairy Cooperative.

(1) a, b and d

(2) b, c and d

(3) a and b

(4) All of the above

---

54. प्रमुख ज्वारी उत्पादक राज्यांमध्ये 2021 – 22 या वर्षातील ज्वारी उत्पादकता (दर हेक्टरी कि.ग्रॅ. मध्ये) नुसार खालील राज्यांची त्यांच्या क्रमवारीनुसार जोड्या लावा.

| | राज्य | | क्रमवारी |
|---|---|---|---|
| a. | उत्तरप्रदेश | i. | पहिली |
| b. | तेलंगणा | ii. | दुसरी |
| c. | मध्यप्रदेश | iii. | तीसरी |
| d. | आंध्रप्रदेश | iv. | चौथी |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (1) | iv | iii | i | ii |
| (2) | ii | i | iv | iii |
| (3) | ii | iii | i | iv |
| (4) | iii | iv | ii | i |

Match the following major Jowar producing states as per their ranks according to Jowar productivity (in kg. per hectare) during the year 2021 – 22.

| | States | | Rank |
|---|---|---|---|
| a. | Uttar Pradesh | i. | First |
| b. | Telangana | ii. | Second |
| c. | Madhya Pradesh | iii. | Third |
| d. | Andhra Pradesh | iv. | Fourth |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (1) | iv | iii | i | ii |
| (2) | ii | i | iv | iii |
| (3) | ii | iii | i | iv |
| (4) | iii | iv | ii | i |

55. भारतीय शेतमाल किंमत धोरणाची उद्धिष्टे खालीलपैकी कोणती आहेत ?

a. कृषी क्षेत्रात बाजार वाढावा निर्माण करणे.
b. शेतमाल किंमतवाढीच्या काळात उत्पादकांचे संरक्षण करणे.
c. शेतकऱ्यांना किमान उत्पन्न मिळवून देण्याची हमी देणे.
d. कृषी क्षेत्रात नवीन तंत्रज्ञानाच्या वापरास उत्तेजन देणे.

(1) विधान a, c आणि d
(2) विधान b, c आणि d
(3) विधान a, b आणि c
(4) विधान a, b, c आणि d

Which of the following are objectives of Indian agricultural price policy ?

a. To create marketable surplus in agricultural sector.
b. To protect the producers in period of increasing agricultural product prices.
c. To provide the guarantee of minimum income to farmers.
d. To give incentives for using new technology in agricultural sector.

(1) Statement a, c and d
(2) Statement b, c and d
(3) Statement a, b and c
(4) Statement a, b, c and d

**56.** महाराष्ट्रातील सहकारी कायद्यांबाबत खालील विधाने विचारात घ्या व योग्य पर्याय निवडा.

a. महाराष्ट्र सावकारी (नियमन) कायदा 2013.

b. महाराष्ट्र सहकारी दुग्ध संस्था कायदा 1960.

(1) फक्त a बरोबर

(2) फक्त b बरोबर

(3) a आणि b दोन्ही बरोबर

(4) a आणि b दोन्ही बरोबर नाही

Consider the following statements about the Cooperative Acts in Maharashtra and choose the correct option.

a. Maharashtra Money-lending (Regulation) Act, 2013.

b. The Maharashtra Co-operative Dairy Societies Act, 1960.

(1) Only a is correct

(2) Only b is correct

(3) Both a and b are correct

(4) Neither a nor b is correct

---

**57.** सहकारी संस्थांच्या निबंधकाच्या बाबतीत खालीलपैकी सत्य विधाने ओळखा.

a. सहकार निबंधकाच्या कार्याची व्याप्ती वाढलामुळे जून 1991 पासून सहकार निबंधकाचे पदनाम सहकारी संस्था आयुक्त व निबंधक असे विस्तारण्यात आले.

b. महाराष्ट्रातील सर्व सहकारी संस्थावर सहकार आयुक्त व निबंधक महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे नियंत्रण असते.

c. सहकार आयुक्त व निबंधकाची नेमणूक केंद्र सरकारद्वारे केली जाते.

d. महाराष्ट्रात एकूण 9 विभागीय सहनिबंधक नियुक्त केले जातात.

(1) विधान a आणि d
(2) विधान b, c आणि d
(3) विधान b आणि d
(4) विधान a, b, c आणि d

Which of the following statements are correct in case of registrar of co-operative societies ?

a. Due to increase in the duties of co-operative registrar the designation of co-operative registrar was extended as commissioner and registrar of co-operative societies from June, 1991.

b. All co-operative societies in Maharashtra comes under the control of state commissioner and registrar of co-operative, Maharashtra state, Pune.

c. Co-operative commissioner and registrar is appointed by central government.

d. In Maharashtra total 9 divisional joint registrar are appointed.

(1) Statement a and d
(2) Statement b, c and d
(3) Statement b and d
(4) Statement a, b, c and d

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

58. 1990 च्या कालखंडात औद्योगिक क्षेत्राची कामगिरी असमाधानकारक असण्याची कारणे ______ हि आहेत.

a. मंदगती गुंतवणूक
b. बाह्य स्पर्धेचे आव्हान
c. पायाभूत सुविधाचा अभाव
d. ग्राहकांच्या मागणीतील विरोधाभास

(1) a आणि b (2) a, c आणि d (3) a, b, c आणि d (4) b आणि d

__________ are the causes of unsatisfactory industrial performance in 1990's.

a. Slowdown in Investment
b. Exposure of external competition
c. Infrastructural constraints
d. Contraction in consumer demand

(1) a and b (2) a, c and d (3) a, b, c and d (4) b and d

---

59. 1991 च्या औद्योगिक धोरणानुसार विदेशी गुंतवणूकीची __________ आवश्यकता आहे.

a. आधुनिकीकरणासाठी
b. निर्यातवाढीसाठी व कर्जफेडीसाठी
c. औद्योगिक विकासासाठी
d. तंत्रज्ञान सुधारणासाठी

(1) a आणि c ही विधाने बरोबर आहेत
(2) a, b आणि c ही विधाने बरोबर आहेत
(3) d हे विधान बरोबर आहे
(4) a, c आणि d ही विधाने बरोबर आहेत

According to Industrial Policy 1991, the Foreign Investment is essential for

a. Modernisation
b. Growing exports and Repaying loan
c. Industrial Development
d. Technology upgrading

(1) a and c these statements are correct
(2) a, b and c these statements are correct
(3) d statement is correct
(4) a, c and d these statements are correct

60. **विधान I** : "बी.बी. महाजन समितीने भारतातील साखर उद्योगासंबधीच्या आपल्या शिफारशीसह समितीचा अहवाल एप्रिल 1998 मध्ये भारत सरकारला सादर केला".

**विधान II** : "डी.व्ही.कपूर समितीने पेट्रो-केमिकल्स उद्योगासंबधीच्या शिफारशीसह आपला अहवाल 1986 साली भारत सरकारकडे सूपूर्त केला".

(1) फक्त I योग्य आहे
(2) फक्त II योग्य आहे
(3) I आणि II दोन्हीही अयोग्य आहेत
(4) I आणि II दोन्हीही योग्य आहेत

**Statement I** : "B. B. Mahajan committee submitted to the Govt. of India, its reports in April 1998 with their recommendations for sugar industry in India".

**Statement II** : "D. V. Kapur committee submitted their reports in 1986 to the Govt. of India, with their recommendations for petro-chemical Industry in India".

(1) Only I is correct
(2) Only II is correct
(3) I and II both are incorrect
(4) I and II both are correct

---

61. खालील विधाने विचारात घ्या.

a. महाराष्ट्र शासनाने मार्च 2021 मध्ये कारवां (कॅरॅव्हन) पर्यटन धोरण मंजूर केले.

b. कारवां (कॅरॅव्हन) पर्यटन धोरण 2021 अंतर्गत स्कूबा डायव्हिंग, वॉटर रैपलिंग आणि ट्रेकिंग यांचा समावेश होतो.

वरीलपैकी कोणते/ती विधान/ने बरोबर आहे/त ?

(1) फक्त b बरोबर आहे
(2) फक्त a बरोबर आहे
(3) दोन्ही a आणि b बरोबर आहेत
(4) वरीलपैकी कोणतेही नाही

Consider the following statements.

a. Government of Maharashtra approved Caravan Tourism Policy in March 2021.

b. Caravan Tourism Policy 2021 covers scuba diving, water rappling and trekking.

Which of the statement/s given above is/are correct ?

(1) Only b is correct
(2) Only a is correct
(3) Both a and b are correct
(4) None of the above

---

62. खालीलपैकी कोणते/ती विधान/ने बरोबर आहे/आहेत ?

a. प्रतीभुती बाजाराशी संबंधीत सर्व मध्यस्थ सेबीद्वारे नियमीत केले जातात.

b. भारतीय प्रतीभुती आणि विनिमय मंडळाची स्थापना 1988 मध्ये झाली.

c. चक्रवर्ती समितीच्या शिफारशीवर सेबीला 1992 मध्ये वैधानिक मान्यता देण्यात आली.

(1) फक्त a विधान
(2) फक्त a आणि b विधाने
(3) a, b आणि c विधाने
(4) फक्त c विधान

Which of the following statement/statements is/are correct ?

a. All intermediaries associated with the securities market are regulated by SEBI.

b. The securities and exchange board of India was set up in 1988.

c. SEBI was given statutory recognition in 1992 on recommendation of the Chakravarty committee.

(1) Only a statement
(2) Only a and b statements
(3) a, b and c statements
(4) Only c statement

---

63. नरसिंहम समितीच्या (1991) शिफारसीचे हेतू ________ होते.

a. परिचालन लवचिकतेचे प्रमाण निश्चित करणे.

b. सार्वजनिक बँकांना निर्णय प्रक्रियेमधील अंतर्गत स्वायत्तता निश्चित करणे.

c. बँकेतील व्यावसायिकता मोठ्या प्रमाणात निश्चित करणे.

d. वरीलपैकी सर्व.

(1) फक्त a (2) a आणि b (3) फक्त c (4) फक्त d

The Narasimham Committee (1991) recommendations were aimed at

a. Ensuring a degree of operational flexibility.

b. Ensuring internal autonomy for the public banks in their decision making process.

c. Ensuring greater degree of professionalism in banking operations.

d. All of the above.

(1) only a (2) a and b (3) only c (4) only d

---

64. खालील विधाने विचारात घ्या.

a. 2018 मध्ये आरबीआयने स्थायी ठेव सुविधा सुरू केली.

b. बँकेच्या सुट्ट्या वगळता आठवड्यातील सर्व दिवस स्थायी ठेव सुविधा उपलब्ध असेल.

c. स्थायी ठेव सुविधा ही लवचिक दर रिव्हर्स रेपोच्या ऐवजी असेल.

वरीलपैकी कोणते/ती विधान/ने चूक आहे/त ?

(1) फक्त a आणि b चूक आहेत
(2) फक्त a आणि c चूक आहेत
(3) फक्त a चूक आहे
(4) फक्त b आणि c चूक आहेत

Consider the following statements.

a. In 2018, the RBI has introduced the Standing Deposit Facility.

b. The Standing Deposit Facility will be available on all days of the week except bank holidays.

c. The Standing Deposit Facility will replace the flexible rate reverse repo.

Which of the statement/s given above is/are incorrect ?

(1) Only a and b are incorrect
(2) Only a and c are incorrect
(3) Only a is incorrect
(4) Only b and c are incorrect

---

65. "अनुदान योजना, ह्या स्टिरॉईड सारख्याच असतात, आळशी डॉक्टरांना त्यांच्या अज्ञानी रुग्णांना स्टिरॉईडचा डोस द्यायला आवडते. स्टिरॉईडमुळे काही काळ बरे वाटते. रुग्णाला त्वरीत आराम मिळतो, परंतु हा रुग्णाचा आजार कायम बरा करण्याचा उपाय नाही" हे विधान खालीलपैकी कुणी केलेले आहे ?

(1) राम जेठमलानी
(2) किशोर जेठनंदानी
(3) डॉ. मनमोहन सिंह
(4) पी. चिदम्बरम्

"Subsidies are akin to steroids as prescriptions. Lazy doctors like to administer to their ignorant patients a dose of steroids to remedy the proximate cause of illness. Steroids provide quick relief but don't promise an enduring cure". This statement is quoted by whom ?

(1) Ram Jethmalani
(2) Kishore Jethnandani
(3) Dr. Manmohan Singh
(4) P. Chidambaram

---

**66.** पायाभूत सुविधांमध्ये __________ हा या क्षेत्रातील गुंतवणुकीचा एक महत्वाचा स्रोत आहे.

(1) मर्यादित भागीदारी
(2) सामान्य भागीदारी
(3) सार्वजनिक खाजगी भागीदारी
(4) मर्यादित दायित्व भागीदारी

__________ in infrastructure has been an important source of investment in the sector.

(1) Limited Partnership
(2) General Partnership
(3) Public Private Partnership
(4) Limited Liability Partnership

---

**67.** 10 व्या पंचवार्षिक योजनेनुसार भारतातील खालीलपैकी __________ राज्यामध्ये 100% खेड्याचे विद्युतीकरण झालेले नाही.

(1) आसाम, ओरीसा, उत्तरप्रदेश, महाराष्ट्र
